रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३०१
www.ramprahar.com
सोमवार, १९ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

लोटे एमआयडीसीत स्फोट, आग; दोन जण जखमी/२
पंडित पाटील यांच्या हस्ते विकासकामांचे भूमिपूजन/५
साळाव परिसरात ड्रोनने शुटींग करणाऱ्यावर गुन्हा/७

## ‘लष्कर-ए-तोयबा’चा कुख्यात दहशतवादी ठार



**कराची** : भारतीय सैन्यदलांनी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी अड्ड्यांना लक्ष्य करीत अनेक दहशतवाद्यांना कंठस्नान घातले होते. या कारवाईमुळे पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले असतानाच आता लष्कर-ए-तोयबा संघटनेचा कुख्यात दहशतवादी सैफुल्ला खालिद याला अज्ञात हल्लेखोरांनी ठार मारले आहे. सैफुल्लाह खालिद हा नेपाळमधून भारतविरोधी कारवाया करण्यात सक्रिय होता तसेच भारतात झालेल्या तीन मोठ्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये त्याचा हात होता. तो ‘लष्कर-ए-तोयबाचा एक ऑपरेटिव्ह होता. त्याने नेपाळमध्ये आपला अड्डा तयार करून भारतामध्ये दहशतवादी हल्ले घडवून आणण्याचा सातत्याने प्रयत्न केला होता, मात्र भारतातील गुप्तचर यंत्रणांना माहिती मिळाल्यानंतर तो नेपाळमधून पळून पाकिस्तानमध्ये जाऊन लपला होता.

# तिरंगा यात्रेद्वारे सैनिकांना सलाम!

## ’ऑपरेशन सिंदूर’मुळे भारतीयांचे मस्तक अभिमानाने उंचावले- आमदार प्रशांत ठाकूर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याचा भारतीय सैन्याने ‘ऑपरेशन सिंदूर’च्या माध्यमातून पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करून समाचार घेतला. त्या अनुषंगाने ऑपरेशन सिंदूर या लष्करी मोहिमेतील भारतीय सशस्त्र दलाच्या अतुलनीय शौर्याचा गौरव करण्यासाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाचा सन्मान करण्याच्या उद्देशाने रविवारी (दि. १८) पनवेलमध्ये भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली.

या यात्रेची सुरुवात पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली, तर समारोप स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळ्याला अभिवादन करून झाले. मार्गक्रमणादरम्यान संपूर्ण पनवेल शहर देशभक्तीच्या घोषणांनी दुमदुमले होते.

या यात्रेत पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर कविता चौतमोल, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीता पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, तळोजा मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, उलवे मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, कर्नाळा मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश कडू, अजय बहिरा, संतोष शेट्टी, मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, तेजस कांडपिळे, बबन मुकादम, राजेंद्र शर्मा, अमित ओझे, रविनाथ पाटील, माजी नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर, राजेश्री वावेकर, वृषाली वाघमारे, सुशीला घरत, सुलोचना कल्याणकर, नलिनी शेलार, सारिका भगत, रूचिता लोंढे, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, संजय भगत, मन्सूर पटेल, राजेश पाटील, योगेश लहाने, ब्रिजेश पटेल, केदार भगत, अमन अख्तर, सतीश पाटील, रुपेश नागवेकर, इर्शाद शेख, भीमराव पोवार, कृष्णा पाटील, स्वाती कोळी, सपना पाटील, समिना साठी, संध्या शारबिद्रे, यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते युवकवर्ग, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### पनवेलकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

या तिरंगा यात्रेद्वारे पनवेलवासीयांनी आपल्या वीर जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आणि भारतीय लष्कराच्या शौर्याला सलाम केला. हातात तिरंगा ध्वज, मनात राष्ट्राभिमान आणि भारत माता की जय, वंदे मातरम जयघोष घेऊन पनवेलकरांनी या यात्रेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय लष्कराने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर अचूक आणि परिणामकारक कारवाई करीत शत्रूला जबरदस्त प्रत्युत्तर दिले. या मोहिमेमुळे देशाची सुरक्षा, सक्षमता आणि आक्रमकता यांचे वैशिष्ट्य अधिक ठळक झाले असून या ऐतिहासिक लष्करी कारवाईमुळे प्रत्येक भारतीयाचे मस्तक अभिमानाने उंचावले आहे. हा पराक्रम देशाच्या रक्षणासाठी सदैव सज्ज असलेल्या जवानांचे आणि देशासाठी कठोर निर्णय घेणाऱ्या नेतृत्वाचे प्रतीक आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भारतीय सैन्य आणि केंद्र सरकारचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार व्यक्त करीत असल्याचे सांगून आपल्या भाषणात राष्ट्रीय एकतेचा संदेश दिला आणि देशसेवेच्या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. (पान २ वर..)

# माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे सर्व स्तरांतून अभीष्टचिंतन

## वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांची रेलचेल





(अधिक छायाचित्रे पान ३, ६, ८ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल शहरात विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले तसेच वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शुभेच्छा देत त्यांचे अभीष्टचिंतन केले.

समाजसेवेच्या ध्येयाने प्रेरित होऊन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सातत्याने नवनवीन उपक्रम राबवले आहेत. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून सामाजिक बांधिलकीचा वारसा घेत त्यांनी लोकाभिमुख कार्यातून जनतेच्या मनात विशेष स्थान निर्माण केले. त्यांचा मनमिळावू, हसतमुख स्वभाव, ज्येष्ठ नागरिकांप्रती असलेला आदरभाव आणि युवा पिढीला दिलेले प्रोत्साहन यामुळे त्यांच्याभोवती नेहमीच कार्यकर्त्यांचा मोठा समुदाय दिसून येतो.

वाढदिवसानिमित्त परेश ठाकूर यांनी वडील लोकनेते रामशेठ ठाकूर, आई शकुंतला ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले; तर भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार निरंजन डावखरे, आमदार विक्रांत पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, वाय. टी. देशमुख, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, हजारो कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभीष्टचिंतन करून त्यांना निरोगी दीर्घायुष्य व पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासकामे आणि सामाजिक उपक्रम राबवले गेले असून सामाजिक बांधिलकीतून त्यांची सर्वसामान्य माणसाशी माणुसकीची नाळ जोडली आहे. त्यामुळे पनवेल परिसरात ते एक आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. (पान २ वर..)

## निवडक

### पाकिस्तानसाठी हेरगिरी; हरियाणात तिसरी अटक

**हिसार** : हरियाणामधील यूट्यूबर ज्योती मल्होत्रा ऊर्फ ज्योती रानीला हेरगिरीच्या आरोपाखाली अटक झाल्यानंतर आता हरियाणामधून आणखी एका तरुणाला हेरगिरीप्रकरणी अटक करण्यात आली आहे. या आठवड्यातली ही तिसरी अटक आहे. अरमान असे अटक केलेल्या तरुणाचे नाव असून तो बऱ्याच काळापासून भारतीय लष्कर डिफेन्स एक्स्पो आणि लष्कराशी संबंधित संवेदनशील माहिती पाकिस्तानला पाठवत होता. त्याच्या मोबाईलमध्ये चॅट, कॉल लॉग, फोटो आणि व्हिडीओ सापडले आहेत.

### रशियाचा युक्रेनवर सर्वात मोठा ड्रोन हल्ला

**किव** : रशियाने युक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा ड्रोन बॉम्बहल्ला केला आहे. या हल्ल्यात रशियाने एकाचवेळी तब्बल २७३ ड्रोन डागले. किव प्रदेशात झालेल्या या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू झाला असून अनेक लोक जखमी झाले आहे. युक्रेनने ६०%पेक्षा जास्त हल्लेखोर ड्रोन निष्क्रिय केले, परंतु हल्ल्यांचा परिणाम विनाशकारी होता, अशी माहिती युक्रेनियन हवाई दलाने दिली.

# पाली भुतिवली धरणात बुडून गोवंडीतील दोन तरुणांचा मृत्यू

**नेरळ : प्रतिनिधी**

सूर्योदय पाहण्यासाठी आलेल्या मुंबईच्या गोवंडीतील दोन तरुणांचा पाली भूतिवली धरणात बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. १८) घडली. बुडालेल्या तरुणांचे मृतदेह ग्रामस्थांनी बाहेर काढले, त्या वेळी या मित्रांचे हातात हात एकत्र असल्याचे दृश्य दिसून आले.

इम्रान अजिज खान आणि खालिद अहमद शेख अशी मृत झालेल्या दोन मित्रांची नावे असून त्यांचा तिसरा मित्र इतेश खांदू आणि सोबत पाळीव कुत्रा होता. या दुर्घटनेत मालक मृत झाल्याने त्याच्याभोवती कुत्रा फेऱ्या मारत होता.

गोवंडी येथील हे तिघे मित्र शनिवारी माथेरानमध्ये आले होते. त्यानंतर रविवारी मध्यरात्री साडेतीनच्या सुमारास आपल्या खासगी कारने कर्जत तालुक्यातील पाली भुतिवली धरणावर पोहचले. त्यांच्यासोबत कुत्रादेखील होता. उगवणाऱ्या सूर्याचे दर्शन घेण्यासाठी या तरुणांनी प्लॅन आखला होता आणि म्हणूनच हे तरुण मध्यरात्रीच धरणाजवळ येऊन बसले होते. दरम्यान, यातील इम्रान आणि खालिद हे पाचच्या सुमारास पाण्यात उतरले. सोबत कुत्राही पोहत होता, तर तिसरा मित्र इतेश खांदू हा धरणाच्या किनाऱ्यावर उभा राहून मित्रांचे व्हिडीओ मोबाईलमध्ये रेकॉर्ड करीत होता. या वेळी पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने दोघे बुडाले.

ही घटना ग्रामस्थांना सांगण्यात आल्यानंतर त्यांच्यामार्फत नेरळ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने पाण्यात बुडालेल्या तरुणांचा शोध घेतला असता त्यांचे मृतदेह एकमेकांच्या हातात हात असलेल्या अवस्थेत सापडले. पाण्यात पोहत असलेला कुत्रा मालकाच्या मृतदेहाच्या बाजूला घिरट्या घालत होता. त्याच्या डोळ्यात पाणीही दिसत होते. नेरळ पोलिसांनी मृतदेह नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले.

# अग्नितांडव!

## हैदराबादमध्ये इमारतीला आग; १७ जणांचा मृत्यू



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

हैदराबादमध्ये एका इमारतीला रविवारी (दि. १८) सकाळी लागलेल्या भीषण आगीमध्ये १७ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. अनेक जण झोपेत असताना ही घटना घडली.

ऐतिहासिक चारमिनार परिसरातील गुलझार हाऊसजवळील एका इमारतीला रविवारी साडेसहाच्या सुमारास आग लागली. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अग्निशामन दलाने तत्काळ बचावकार्य सुरू करीत आगीवर चार तासानंतर नियंत्रण मिळवले.

या इमारतीमध्ये भाडेकरूंचे प्रमाण जास्त आहे. दुर्घटनेतील जखमींना तातडीने वेगवेगळ्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

## सोलापुरात कारखान्यामध्ये आग; आठ जण मृत्युमुखी

**सोलापूर : प्रतिनिधी**

सोलापुरातील अक्कलकोटच्या एमआयडीसी रोडवरील सेंट्रल कारखान्यात रविवारी (दि. १८) पहाटे ३च्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या दुर्घटनेत कारखाना मालकाच्या कुटुंबासह आठ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये पाच पुरुष, दोन महिला व एका बालकाचा समावेश आहे.

या वेळी कारखान्यात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे प्रयत्न करण्यात आले, मात्र आठ जणांचा मृत्यू झाला. सेंट्रल इंडस्ट्रीचे मालक उस्मान मन्सूरी (वय ८७), अनस मन्सूरी (वय २४), शीफा मन्सूरी (वय २२), युसुफ मन्सूरी (वय १), आयेशा बागवान (वय ३८), मेहताब बागवान (वय ५१), हिना बागवान (वय ३५), सलमान बागवान (वय ३८) अशी होरपळून मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. सर्व आठही मृतदेह हे विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात नेण्यात आले आहे.





# ’अभंग रिपोस्ट’मधून भक्तिभावाचा अनुभव

## गायकांसह उपस्थितांनी केला विठूरायाचा गजर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व युवाशक्तीचे प्रेरणास्थान परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अभंग रिपोस्ट या कला आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण अशा कार्यक्रमाचा हजारो पनवेलकरांनी आनंद घेतला. शहरातील गुजराती शाळेच्या मैदानावर हा कार्यक्रम भक्तिभावाचा संदेश देऊन गेला.



या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांची, तर प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची उपस्थिती लाभली.

या वेळी सर्वजण विठूरायाच्या गजरात तल्लीन झाले होते. यामध्ये लहानग्यांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी भक्तिभावाचा अनुभव घेतला. विशेषतः तरुणाईचा मोठा प्रतिसाद लाभला. (पान २ वर..)

# १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार; महाराष्ट्रातील सात जणांचा समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १७ खासदार आणि दोन संसदीय स्थायी समित्यांची संसदरत्न पुरस्कार २०२५साठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सात खासदारांचा समावेश आहे.

संसदेत सक्रिय सहभाग, वादविवादात सहभाग, प्रश्न विचारणे आणि कायदेविषयक कामात योगदान या आधारावर हे पुरस्कार दिले जातात. हा पुरस्कार प्राइम पॉइंट फाउंडेशनने सुरू केला आहे. या वर्षीच्या विजेत्यांची निवड हंसराज अहिर (अध्यक्ष, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केली.



पुरस्कार मिळालेल्या खासदारांमध्ये भर्तृहरी महताब, मेधा कुलकर्णी, प्रवीण पटेल, रवी किशन, निशिकांत दुबे, विद्युत बरन महतो, पी.पी. चौधरी, मदन राठोड, दिलीप सैकिया, स्मिता वाघ (भाजप), श्रीरंग बारणे, नरेश म्हस्के (शिवसेना), वर्षा गायकवाड (काँग्रेस), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी शरद पवार पक्ष), अरविंद सावंत (शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष), सी.एन. अन्नादुराई (द्रमुक), एन. ऑफ. प्रेमचंद्रन (आरएसपी) यांचा समावेश आहे.

या वर्षी दोन संसदीय स्थायी समित्यांनाही संसदरत्न पुरस्काराने सन्मानित केले जाईल. भर्तृहरी महताब अध्यक्ष असलेले वित्त स्थायी समितीला हा पुरस्कार मिळाला असून चरणजित सिंग चन्नी अध्यक्ष असलेल्या कृषी स्थायी समितीचीही दखल घेण्यात आली आहे.

# १३ कोटींचे ड्रग्ज जप्त; पाच जणांना अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

एका मोठ्या ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश करण्यात मुंबई पोलिसांना यश आले. मुंबई पोलिसांनी या प्रकरणात पाच जणांना अटक केली आहे. पोलिसांनी ड्रग्जही जप्त केले असून त्याची बाजारभावानुसार १३ कोटी किंमत आहे.

मुंबईमध्ये मार्च महिन्यात मुंबई पोलिसांनी एका आरोपीला ड्रग्जसह पकडले आणि अटक केली. त्याच्या ४.५ लाखांचे एमडी नावाचे ड्रग्ज सापडले होते. एका अधिकाऱ्याने सांगितले की, अटक केल्यानंतर आरोपीची चौकशी करण्यात आली. आरोपीने त्यांच्या साथीदारांची नावे चौकशीत उघड केली. त्याच माहितीच्या आधारे पोलिसांनी धाड टाकून पाच आरोपींना अटक केली. आरोपींविरोधात एनडीपीएस कायद्यातील कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या रॅकेटमध्ये आणखी कोण आहेत याचा शोध पोलीस घेत असून आरोपींची चौकशी सुरू केली आहे.

# लोटे एमआयडीसीत आग आणि स्फोट

## दोन घटनांमध्ये दोघे जखमी



**दापोली : प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील लोटे औद्योगिक वसाहतीमध्ये लासा कंपनीचा कारखाना आगीच्या भक्षस्थानी पडला होता, तर दुसऱ्या बाजूला क्लिला ऑरगॅनिक प्रायव्हेट लिमिटेड या कारखान्यात रिऍक्टरचा स्फोट होऊन दोन कामगार गंभीररित्या होरपळले. हा स्फोट रविवारी दुपारी पावणेतीन वाजता झाला.

रविवारी लासा या कारखान्याला भीषण आग लागली होती.या आगीचे लोळ तीन ते चार किलोमीटर अंतरावरूनही स्पष्टपणे दिसत होते, औद्योगिक वसाहतीच्या आगीचेबंब ती आग विझवण्यामध्ये व्यस्त होते.संपूर्ण औद्योगिक वसाहत तसेच पंचक्रोशीतील नागरिक हे त्या ठिकाणी जमले असतानाच पावणेतीन वाजता महामार्गाच्या पश्चिमेकडील क्लिला ऑरगॅनिक प्रायव्हेट लिमिटेड या कारखान्यात रिऍक्टरचा स्फोट झाला आणि दोन कामगार गंभीररीत्या भाजले.

मात्र या कारखान्यात रुग्णवाहिका नसल्यामुळे जखमी कामगारांना उपचारार्थ रुग्णालयात हलवण्यासाठी दुचाकीचा वापर करण्यात आला. ज्या कामगारांच्या जीवावर आपली आस्थापना चालते अशा कामगारांच्या बाबतीत एवढी उदासीनता पाहून पंचक्रोशीतील नागरिकांनी संताप व्यक्त केला.

या दुर्घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्राथमिक माहिती नुसार, ही आग लासा कंपनीच्या परिसरात लागली असून त्याचा परिसरातील अन्य कारखान्यांवरही संभाव्य धोका निर्माण झाला आहे.

घटनास्थळी लोटे औद्योगिक वसाहतीचे अग्निशमन दल तातडीने दाखल झाले असून आग नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत. आलेली नाही.

दरम्यान, खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील इतर कारखान्यांमध्ये सायरन वाजवून इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी आणि कामगारांनी सुरक्षित अंतरावर राहण्याचे आवाहन केले आहे.



**पनवेल : कोपर गाव येथील स्मशानभूमी पाडण्यासाठी सिडकोचे पथक सोमवारी येणार आहे. या पार्श्वभूमीवर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत खारकोपर हनुमान मंदिरात रविवारी बैठक झाली. या बैठकीस ग्रामस्थ मंडळ व पंच कमिटी यांची उपस्थिती होती. कोपर येथील पारंपरिक स्मशानभूमी सुमारे दीडशे ते दोनशे वर्षे जुनी असून ती तोडू देणार नाही, असा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे.**

## खारघरमध्ये स्व. श्री काळूराम महादू पाटील स्मृती चषक स्पर्धा

**खारघर : प्रतिनिधी**

माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रवीण स्पोर्ट वेलफेअर असोसिएशनच्या वतीने स्व. श्री काळूराम महादू पाटील स्मृती लेदर बॉल चषक स्पर्धे चे आज खारघर येथे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत १२ वर्षांखालील वयोगटातील मुलांचा सहभाग घेतला. या स्पर्धेत एकूण १६ संघांनी आपला सहभाग नोंदवला. खारघरमधील क्रिकेट रसिक प्रेक्षकांचा या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या स्पर्धेत बी.पी. पाटील अकॅडमी (खारघर) संघाने शानदार कामगिरी करत प्रथम पारितोषिक पटकावले, तर कोंडालकर संघ (रसायनी) यांनी द्वितीय पारितोषिक मिळवले.



# आंबा महोत्सवाला आमदार निरंजन डावखरेंची भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंबा महोत्सवासारख्या उपक्रमांमुळे पुढच्या पिढीला आपल्या संस्कृतीचा वारसा आपण देत आहोत. या महोत्सवाच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीला टिकवण्याची एक चळवळ सुरू करत आहोत. असे गौरोद्गारकोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी आंबा महोत्सवावेळी काढले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून पनवेलमध्ये पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या आंबा महोत्सवाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. शहरातील गुजराती शाळेच्या मैदानावर सुरू झालेल्या या तीन दिवसीय महोत्सवात आंब्यांच्या विविध प्रकारांसोबत सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी आहे.



शनिवारी सुप्रसिद्ध अभंग रिपोस्टफ बँडचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अभंग रिपोस्टफहे पारंपरिक अभंगांना आधुनिक संगीताचा साज चढवून सादर करणारे लोकप्रिय मंडळ आहे. त्यांच्या अनोख्या शैलीमुळे तरुण पिढीमध्येही अभंगांची गोडी निर्माण झाली आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला पनवेल आणिपरिसरातील नागरिकांनी तसेच विशेष करून तरुणांनी मोठ्या उपस्थिती दर्शवली.


या महोत्सवात केवळ आंब्यांची विक्री आणि प्रदर्शनच नाही, तर विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी शनिवारी या महोत्सवाला उपस्थित होते. यावेळी त्यांनी सर्व स्टॉलला भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनीआंबा महोत्सवासाफ्या उत्कृष्ट नियोजनाचे कौतुक करून आगामी काळात आंबा महोत्सवा बरोबर जांभूळआणि करंवदे यांसारख्या राणमेव्यांचा देखील महोत्सवामध्ये सहभागी करावा जेणे करून ग्रामिण भागातीलविषेश करून आदिवासी भागातील महिलांना हक्काचे व्यासपिढ उपलब्ध होईल असे प्रतिपादन केले.

यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी जयंत पगडे ,चारुशीला घरत ,ब्रिजेश पटेल, पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, एकनाथ गायकवाड,गणेश कडू, राजू सोनी, अजय बहिरा, माजी नगरसेविका राजेश्री वावेकर, वृषाली वाघमारे, प्रीती जॉर्ज,सुरेखा मोहकर, रुचिता लोंढे–समेळ, नवीन पनवेल शहर मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल शहर मंडळअध्यक्ष सुमित झुंजारराव, शहर सरचिटणीस अमित ओझे, रुपेश नागवेकर, अभिषेक पटवर्धन, गणेश पाटील, पवन सोनी, चिन्मय समेळ, केदार भगत, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, स्वाती कोळी कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# नेव्हिगेशन स्क्रिनमुळे नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात हव्या असलेल्या विभागात जाणे झाले सोपे

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका मुख्यालय इमारतीस अनेक नागरिक विविध कामांसाठी भेटी देत असतात, त्याचप्रमाणे ही इमारत आयकॉनिक रचनेची असल्याने विविध मान्यवर तसेच पर्यटकही मुख्यालय वास्तू बघण्यासाठी येत असतात. ही इमारत भव्यतम व वैशिष्ट्यपूर्ण अशी गोलाकार रचनेची असल्याने नागरिकांना कोणता विभाग कितव्या मजल्यावर व कोणत्या दिशेला आहे हे समजण्यासाठी येथे दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच डिजीटल स्क्रिनवरही त्याबाबतची माहिती प्रसिध्द करण्यात आलेली आहे.



यामध्ये अधिक अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या दृष्टीने किऑक्स स्वरुपातील 'दिशादर्शक अथात नेव्हीगेशन स्क्रिन' लावण्यात आली असून त्यामुळे नागरिकांना अत्यंत सुलभ रितीने आपल्याला हवा असलेला विभाग व अधिकाऱ्यांचे दालन शोधणे सोपे झाले आहे.

नेव्हिगेशन स्क्रिन टचस्क्रिन स्वरुपाची असून या नेव्हिगेशन स्क्रिनवर मुख्यालयाच्या प्रत्येक मजल्याचे रेखाचित्र दिसते. त्यामधून नागरिकांनी आपले काम असलेल्या संबंधित विभागावर अथवा अधिकारी यांच्या पदनामावर नेव्हिगेशन स्क्रिनवर टच केल्यास लिफ्टमधून उतरल्यानंतर कोणत्या दिशेला जायचे याचा मार्ग दाखविला जातो. त्याचप्रमाणे तो मार्गक्रम लिखीत स्वरुपातही दर्शविला जातो. नागरिकांच्या सोयीसाठी मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये नेव्हीगेशन स्क्रिनवर मजकूर प्रदर्शित करण्यात आला असून ज्या विभागांना जास्तीत जास्त नागरिक भेट देतात ते विभाग प्राधान्यक्रमाने दिसण्याचीही सुविधा करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत तळमजल्यावरील मध्यवर्ती लिफ्टच्या बाजूला ही नेव्हीगेशन स्क्रिन स्टँडवर बसविण्यात आलेली असून दुसरा, तिसरा व चौथा अशा एकूण चार मजल्यांवर अशा प्रकारच्या नेव्हीगेशन स्क्रिन लावण्यात येत आहेत. यामुळे नागरिकांचे ज्या विभागात अथवा ज्या अधिका–याकडे काम आहे त्याची प्रत्यक्ष माहिती मिळणार असल्याने तेथे थेट जाणे सोयीचे होणार आहे.

महानगरपालिका मुख्यालयात असलेल्या विविध विभागांकडे जाण्याचे मार्गक्रम दर्शविणारे फलक ठिकठिकाणी प्रदर्शित करण्यात आलेले आहेत. यामध्ये अधिक भर घालत नेव्हिगेशन स्क्रिनमुळे सर्वसामान्य नागरिकांना फारशी शोधाशोध करावी न लागता ज्या विभागात काम आहे त्या विभागामध्ये विनासायास पोहचणे सुलभ होणार आह

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन नागरिकांची महानगरपालिकेशी संबधित सर्व कामे सहजपणे व्हावीत यावर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचा भर असून त्यादृष्टीने संबधित सर्व लोकसेवा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. नागरिकांना त्रास होउ नये याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

## माजी नगरसेवक रवींद्र भगत यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक रवींद्र भगत यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोली मध्ये भव्य रक्त दान शिबिराचे आणि आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन रवींद्र भगत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान या शिबिरात नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी, चष्मा वाटप, आणि रक्तदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. या शिबिरात तज्ञ डॉक्टरांच्या टीमने नागरिकांची आरोग्य तपासणी केली. तसेच, गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

मोठ्या संख्येने नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. याकार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, कलंबोलीमंडळ अध्यक्ष अमर पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम यांच्यासह मान्यवरमोठ्या संख्येने उपस्थित होते.






**पनवेल : भाजप युवा नेते तथा महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भानघर, नेरे येथील करुणेश्वर ओल्डेज केअर हाऊस वृद्धाश्रमात अल्पोपहार देण्यात आला. या वेळी उत्तर रायगड जिल्हा ओबीसी मोर्चा जिल्हा चिटणीस प्रसाद म्हात्रे, सोशल मीडिया जिल्हा प्रभारी प्रसाद हनुमंते, सूर्यकांत पंडित, किशोर पाटील, सद्दाम बागवान, अशांत पाटील, माजीद बागवान, संतोष वर्तले, सूरज पावणेकर उपस्थित होते. वृद्धाश्रमातील वृद्धांनी परेश ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि दीर्घायुष्यासाठी आशीर्वाद दिले.**

## कामोठे येथे भव्य तिरंगा रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भव्य तिरंगा रॅली शनिवारी आयोजित करण्यात आली होती. भारतीय जवानांच्या शौर्याला आणि त्यागालासलाम करण्यासाठी तसेच देशभें॑ची भावना जागृत करण्यासाठी या रॅलीचेआयोजन करण्यात आले होते.

कामोठे पोलीस चौकीपासून सुरू झालेली ही रॅली एम.एन. आर. स्कूलजवळसांगता झाली. या रॅलीमध्ये पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, भाजपचे कामोठे शहराध्यक्ष विकास घरत,माजी नगरसेवक अरुणकुमार भगत, गणेश कडू, विजय चिपळेकर, दिलीप पाटील,समाजसेवक प्रदीप भगत, युवा नेते हॅप्पी सिंग, हर्षवर्धन पाटील, सुशील शर्मा,दामोदर चव्हाण, विद्या तामखेडे, हरजिंदर कौर यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिकसहभागी झाले होते.

रॅलीत सहभागी झालेले नागरिक भारत माता की जयच्याघोषणा देत होते आणि भारतीय लष्कराविषयी कृतज्ञता व्यक्त करत होते. या रॅलीत नागरिकांनी हातात तिरंगा घेऊन उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पर्यटकांना यावेळी श्रद्धांजली अर्पण केली.



## मीनाक्षी जयस्वाल हत्याकांड; तीन जणांना जन्मठेप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दहा वर्षापूर्वी खारघर येथे संपूर्ण पनवेल तालुक्यात खळबळ माजवणाऱ्या ॲड. मीनाक्षी जयस्वाल खून खटल्यात दोषी ठरलेल्या तिघा आरोपींना दि.१७ रोजी पनवेल सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. एस. शिंदे यांनी तीन आरोपीना जन्मठेपेची शिक्षा सुनावत प्रत्येकी ७० हजारांचा दंड ठोठावला.

सदर खटला प्रलंबित असताना आरोपी क्र. ४ सुरेंद्रकुमार चमनलाल बत्रा यांचे निधन झाले आहे. आरोपी क्र. १ मणींदर सिंग उर्फ मणी सुखविंदरसिंग बाजवा उर्फ जोरावरसिंग उर्फ मिठू ,आरोपी क्र.२ विनायक थावरा चव्हाण आणि आरोपी क्रमांक ३ सुरज रामभवन जैस्वाल यांना अटक करून यांचे विरुद्ध अलिबाग येथील सत्र न्यायालयात खटला दाखल केला होता.सदर खटल्याची सुनावणी अंतिमतः पनवेल येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. एस. शिंदे साहेब यांच्या न्यायालयात झाली. या प्रकरणी विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. उज्वल निकम यांनी काम पाहिले. त्यांना विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. प्रसाद एस. पाटील यांनी सहकार्य केले.

पान १ वरुन

## तिरंगा यात्रेद्वारे सैनिकांना सलाम!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सैन्याला पूर्ण सूट दिली आणि सैन्याने पाकिस्तानला त्यांची जागा दाखवून दिली. पाकिस्तानने आपल्या देशावर हल्ले केले, पण आपल्या देशाच्या सैन्याने चोख उत्तर देत त्यांचे हल्ले परतवून लावत त्यांचे दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. आणि अखेर पाकिस्तानला आपल्या भारत देशापुढे शरणागती पत्करावी लागली. भारत देश हा संस्कृती आणि एकतेने नटलेला देश आहे. त्यामुळे भारतावर हल्ले करणाऱ्यांना जशास तसे आणि कठोर उत्तर मिळेल, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी नमूद केले.

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे सर्व स्तरांतून अभीष्टचिंतन

वाढदिवसाच्या निमित्ताने पनवेल महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी कार्यक्रमांची मालिका पार पडली. त्यामध्ये खारघर येथे पनवेल लीग फुटबॉल स्पर्धा, कळंबोलीत अंडरआर्म क्रिकेट स्पर्धा, कामोठे येथे भव्य कुस्ती स्पर्धा, पनवेलमध्ये आंबा महोत्सव, अभंग रिपोस्ट आणि वारसा संस्कृतीचा या नावाने संगीत, नृत्य व कलेचा संगम असलेला सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमाबरोबर विकासकामांचे भूमिपूजन यांचा समावेश होता. हे सर्व उपक्रम समाजाच्या सर्व स्तरांना स्पर्श करणारे ठरले असून पनवेलकरांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## 'अभंग रिपोस्ट'मधून भक्तिभावाचा अनुभव

वारकरी सांप्रदायातील अभंग, भजनांना टाळ मृदंगासोबतच पाश्चात्य वाद्यांची जोड देण्याचे काम अभंग रिपोस्ट बँड करीत आहे. या बँडने आतापर्यंत साडेसहाशे लाईव्ह परफॉमन्स सादर केले आहेत. या बँडला नुकतेच झी २४ तास वृत्तवाहिनीकडून राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्र गौरव २०२५ या पुरस्काराने गौरविण्यात आले. अशा या कार्यक्रमाची उत्सुकता पनवेलकरांना लागली होती, ती या आयोजनाच्या निमिताने पूर्ण झाली. या कार्यक्रमातून भक्तिभाव, संगीत व सांस्कृतिकतेचा संगम अनुभवायला मिळाला.

या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून माजी नगरसेवक जयंत पगडे, अनिल भगत, गणेश कडू, एकनाथ गायकवाड, राजू सोनी, अजय बहिरा, गणेश पाटील, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, ब्रिजेश पटेल, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत तसेच वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर, डॉ. सुरेखा मोहोकर, ॲड. वृषाली वाघमारे, रूचिता लोंढे, अमित ओझे, स्वाती कोळी, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, केदार भगत, रूपेश नागवेकर, प्रशांत मोरबाळे, संदीप पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

पनवेलकरांच्या मनोरंजनाबरोबरच अध्यात्मिक समाधानासाठीही हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम मनावर ठसा उमटवणारा ठरला. या कार्यक्रमाचे आयोजन पनवेल शहर भाजपच्या वतीने करण्यात आले होते. या वेळी उपस्थित मान्यवरांनी या ठिकाणी आलेल्या आंबा महोत्सवाच्या अनुषंगाने स्टॉलला भेट दिली.

## संपादकीय

# अवकाळी ते मान्सूनची चाहूल

भारतातील शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून नैऋत्य मोसमी पाऊस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. दरवर्षी जून ते सप्टेंबर या कालावधीत भारतात पाऊस पडतो, जो कृषी क्रियाकलापांचा पाया ठरतो. २०२५मध्ये नैऋत्य मोसमी पावसाचे स्वरूप, त्याचे आगमन, वितरण व एकूण पर्जन्यमान याबद्दल काही आशादायक, तर काही चिंताजनक बाबी समोर येत आहेत.

**भारतीय हवामान विभागाने यंदाच्या वर्षासाठी सरासरीच्या जवळपास पावसाचा अंदाज वर्तवला आहे. अंदाजानुसार देशात ९६% ते १०४%दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे, म्हणजेच सामान्य पाऊस पडेल. विशेषतः महाराष्ट्र, मध्य प्रदेश, ओडिशा, तेलंगणा या भागांत सरासरीपेक्षा थोडा अधिक पाऊस होऊ शकतो, पण यंदा 'एल निनो'च्या प्रभावाचे प्रमाण कमी असल्याने पावसाचे वितरण अधिक संतुलित राहण्याची शक्यता आहे. मान्सूनपूर्वी एप्रिल महिन्यात तसेच सध्या मे महिन्यात महाराष्ट्र, गुजरात, मध्य भारतातील अनेक भागांमध्ये अवकाळी वादळी पाऊस, गारपीट होत आहे. सामान्यतः अवकाळी पावसामुळे हवामानात गारवा निर्माण होतो, पण शेतकऱ्यांसाठी हा पाऊस गंभीर समस्या निर्माण करतो. या 'अवकाळी'मुळे फळबागा तसेच कांदा, द्राक्ष, भुईमूग, हरभरा यांसाख्या पिकांचे मोठे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांना नुकसानीचा सामना करावा लागल्याने विमा दावा प्रक्रिया सुरू करण्यात आली. हवामान बदलाचा परिणाम केवळ पावसावर मर्यादित नसून त्याचा थेट परिणाम जमिनीची आर्द्रता, बियाण्यांची पेरणी, उत्पादनाची गुणवत्ता आणि कापणीच्या वेळेवर होतो. पावसाच्या आगमनात विलंब झाल्यास खरीप हंगामाची सुरुवात उशिरा होऊ शकते. काही भागांत अतिपावसामुळे शेती पाण्याखाली जाण्याचा धोका असतो. सध्याच्या हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आधुनिक हवामानशास्त्रीय माहिती वेळेवर उपलब्ध करणे हे अत्यंत गरजेचे झाले आहे. मोबाईल ॲप्स, कृषी विज्ञान केंद्र आणि ग्रामपातळीवरचे प्रशिक्षण यांचा योग्य उपयोग केल्यास नुकसानाचे प्रमाण कमी करता येईल. अवकाळी पावसाचे प्रमाण वाढत चालले आहे आणि ही जागतिक हवामान बदलाची लक्षणे आहेत. समुद्राच्या तापमानात होणारे बदल, कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण, जंगलतोड यांचा थेट संबंध पावसाच्या चक्राशी आहे. म्हणूनच केवळ अल्पकालीन योजना नव्हे; तर दीर्घकालीन पर्यावरण रक्षणाचे धोरण राबवणे काळाची गरज आहे. गेल्या काही वर्षांपासून हवामानात लक्षणीय बदल दिसून येत आहेत. ऋतूचक्र विस्कळीत होत आहे. एकीकडे काही भागांत अतिवृष्टी, तर दुसरीकडे काही ठिकाणी दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होत आहे. अशा असंतुलित पर्जन्यमानामुळे जलसंपत्तीचे व्यवस्थापन करणे अधिक आव्हानात्मक झाले आहे. मान्सूनचा कालावधी कमी असतानाही काही भागांत प्रचंड मुसळधार पाऊस पडतो, ज्याचा परिणाम पूरस्थिती आणि शहरी भागांतील जलतारण यंत्रणांवर होतो. या वर्षीचा नैऋत्य मोसमी पाऊस काही प्रमाणात समाधानकारक असला तरी हवामानातील अस्थिरतेमुळे शेतकऱ्यांना सतत सावध राहणे गरजेचे आहे. सध्याचा अवकाळी पाऊस आणि बदलत्या वातावरणामुळे शेती व्यवसाय अधिक जोखमीचा झाला आहे, परंतु योग्य नियोजन, तांत्रिक मदत, शासनाच्या योजना आणि पर्यावरण पूरक उपाययोजना यामुळे आपण हे आव्हान यशस्वीपणे पार करू शकतो.**

# कर्जतमधील बळीराजाचे संकट काही टळेना...!

खबरबात
विजय मांडे



आपला भारत देश कृषीप्रधान देश म्हणून सर्व जगात ओळखला जातो. ज्या शेतकऱ्यामुळे भारताची ओळख आहे. तोच कित्येक वर्षे अडचणींशी सामना करीत जीवन जगत आहे. लहरी हवामान, भेसळ बियाणे, मजुरांची वानवा आदी अडचणींमुळे शेतकरी अगदी मेटाकुटीस आला आहे. यंदा ८ मेपासून अवकाळी पावसाने तालुक्यात धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे दुबार भात शेतीतील हुकमी पीकांचे नुकसान झाले आहे.

रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून ओळखले जात होते, मात्र आता सारे काही बदलले आहे. भात बियाणांची पैदास करणारे कोकण कृषी विद्यापीठाचे प्रादेशिक कृषी केंद्र आपल्या जिल्ह्यातील कर्जतमध्ये आहे, पण अडचणींवर मात करताना शेतीवरील नव नवीन प्रयोग करण्याची हिंमत शेतकऱ्यांमध्ये नाही. अर्थात, काही शेतकरी त्याला अपवाद असतील.

कर्जत तालुक्याविषयी बोलायचे झाले तर तालुक्यात औद्योगिक कारखाने नाहीत, मात्र त्यामुळे सुरुवातीला मुंबईकरांनी जमिनी घेऊन फार्महाऊस तयार केले आणि शोकांतिका अशी की, ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी 'मुंबईकर शेतकऱ्यांना' विकल्या त्यांच्या तयार झालेल्या फार्महाऊसवर रखवालदार म्हणून काम करावे लागत होते. अजूनही काही मूळचे शेतकरी त्यांच्या फार्महाऊसवर काम करीत आहेत, कारण शेती विकून आलेले पैशातून नवीन घर बांधले. चारचाकी गाडी घेतली. मुला-मुलींचे विवाह अगदी धूमधडाक्यात लावले व पैसा संपला आणि हो अजून एक महत्त्वाचे कारण म्हणजे काही शेतकरी अशिक्षित त्यांची मुलांना आपसूकच अमाप पैसे मिळाल्याने हे पैसे घेऊन कुणी लेडीज बार, तर कुणी बारमध्ये जाऊन पैशांची उधळपट्टी करू लागले व आपले जीवन उद्ध्वस्त करून बसले. काळानुरूप आता बदलत चालले आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे शेतकऱ्यांची मुले शिकू लागली आणि काहींनी आपल्या जमिनीवर रिसॉर्ट किंवा फार्महाऊस सुरू केले, पण त्यांची संख्या अगदी हाताच्या बोटावर मोजण्या इतपतच आहे.

कर्जत तालुक्यात पन्नास-साठ वर्षांपूर्वी पाण्याचे दुर्मिक्ष होते. प्यायलासुद्धा पाणी मिळवता मिळवता घरातील महिलांच्या डोळ्यात पाणी यायचे, परंतु १९६०च्या दरम्यान राजानाला कालवा सुरू झाला आणि त्या परिसरातील शेतीचे बरेचसे क्षेत्र सिंचनाखाली आले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडावर हासू आले. पाणीटंचाई दूर झाली. केवळ पावसाळ्यात भातपीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना दुबार भातशेती करण्याची संधी मिळाली आणि शेतकऱ्यांच्या कष्टाचे चीज होऊ लागले. लहरी हवामानापेक्षा उन्हाळी भातशेतीचे उत्पन्न दोन-अडीच पट मिळू लागले. अशाच प्रकारे नेरळमधील अवसरे भागातही सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले आणि त्या परिसरातही दुबार भातशेतीचे उत्पन्न मिळू लागले.

काही वर्षांपूर्वी राजानाला दुरूस्तीचे काम हाती घेतले ते नियोजनाअभावी वेळेत पूर्ण झाले नाही. त्यामुळे कालव्याला पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी दुबार भातशेती करणे बंद केले. काही शेतकऱ्यांनी कडधान्य ,तर काहींनी टोमॅटो, कलिंगड, भाजीपाला अशी शेती करण्यास सुरुवात केली. या शेतकऱ्यांची संख्या दहा टक्केदेखील नाही. त्यामुळे भाताचे पीक घेणारे शेतकरी अडचणीत आले. मजुरांची वानवा, मोकाट गुरांचा प्रश्न उद्‌भवू लागला. या वेळी पावसाचा तडाखा बसू लागला. कधी पाऊस लांबणीवर गेल्यावर पेरलेले भात बियाणे पक्षांनी फस्त केले. नंतर पेरलेले बियाणे भरपूर पाऊस पडल्याने वाहून गेले. त्यामुळे शेतकऱ्यांची इकडे आड तिकडे विहीर अशी परिस्थिती होऊ लागली. सततच्या नुकसानीमुळे युवा पिढी शेतीपासून दूर जाऊ लागली. त्यामुळे अनेकांची शेती ओसाड होऊ लागली. जे शेतकरी आपली जमीन काळी आई म्हणून कसत आहेत त्यांनी पिकवलेले भात हमी भाव खरेदी केंद्रावर नेल्यानंतर आठ-दहा दिवस वाट पहावी लागते. त्याचप्रमाणे लहरी हवामानमुळे खरेदी केंद्रावर नेलेले भात कधी कधी भिजते. गेल्या हंगामातील केंद्रावर दिलेल्या भाताचे पैसे मिळाले नाहीत. शासकीय योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. ठराविक शेतकरी या योजनांचा लाभ घेताना दिसतात. म्हणूनच यंदा खरीप पिकासाठी आयोजित केलेल्या नियोजन व आढावा बैठकीत आमदार महेंद्र थोरवे यांनी कृषी विभाग व महसूल विभागाला शासकीय योजना तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी पुढाकार घेण्याची सूचना करावी लागली. या सूचना करताना त्यांनी काही विभागाच्या अधिकारी वर्गाची चांगलीच कानउघडणी केली.

भात पैदास केंद्र कर्जतमध्ये आहे. त्याचा लाभ ठराविक शेतकरी घेताना दिसतात. याचे कारण युवा पिढीला शेतीबद्दल आस्था नाही. त्यामुळे सर्व उपलब्धता असताना शेतीतील उत्पन्न कमी होत आहे. शासकीय योजना आहेत, पण त्याचा लाभ शेतकऱ्यांना होत नाही. काही हुशार शेतकरी लाभ करून घेतात. घरातील वय झालेल्या शेतकऱ्यांचा आपली काळी आई विकण्यास विरोध आहे, मात्र शेती ओसाड ठेवण्यापेक्षा विकून टाकण्याकडे त्या घरातील युवा पिढीचा कल आहे. जमीन विकताना अनेक अडचणी येतात त्यातच हिश्यासाठी भाऊ-बहिणींमध्ये वाद आहेत. त्यामुळे कोर्ट कचेऱ्या सुरू असल्याने अनेकांची रक्षाबंधन व भाऊबीज बंद झाली आहे. विशेष म्हणजे कोकणातील शेतकऱ्यांना कितीही अडचणी आल्या आणि पीक आले नाही तरी कोकणातील शेतकरी मनाने खचत नाही. उलट नाव नवीन प्रयोग करून मार्ग काढत असतो आणि त्यातून नवीन उत्पादन काढत असतो म्हणूनच कोकणातील शेतकरी आत्महत्या करण्याचा भानगडीत पडत नाही. अगदी मोजकेच शेतकरी कृषी विभागाकडे जात असतात आणि योजना समजून घेऊन त्याचा लाभ घेत असतात. त्यामुळे शेतकऱ्यांकडे जाऊन जनजागृती करून योजना समजावून सांगण्यासाठी शिबिरे, परिसंवादाची व कार्यशाळेची आवश्यकता आहे. एकंदरीत काहीही करा शेतकरी अडचणीतच आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### इंटरनेट व सिमकार्डशिवाय टीव्ही, व्हिडीओ पाहता येणार

गेल्या काही दिवसांपासून भारतात डिरेक्ट टू मोबाइल/डीटूएम तंत्रज्ञानाची बरीच चर्चा ऐकायला मिळत आहे. भारतात हे तंत्रज्ञान लवकरच सामान्यांसाठी उपलब्ध होणार आहे. मीडिया अहवालांनुसार या तंत्रज्ञानाचं परीक्षण पूर्ण झालं आहे,.सर्व प्रकारच्या चाचण्या पूर्ण झाल्या आहेत. त्यामुळे आता हे तंत्रज्ञाना बाजारात दाखल होण्यासाठी सज्ज आहे. आता केवळ सरकारच्या मंजुरीची प्रतीक्षा आहे.




या तंत्रज्ञानाला माहिती आणि प्रसारण मंत्रालयाकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर कोट्यवधी स्मार्टफोन युजर्ससाठी ही सुविधा उपलब्ध होईल. या तंत्रज्ञानामुळे मोबाइलवर इंटरनेटशिवाय टीव्ही चॅनेल्सचा ॲक्सेस मिळेल.

या तंत्रज्ञानामुळे लोक इंटरनेटशिवाय, कोणत्याही सिमकार्डशिवाय त्यांच्या मोबाइल फोनवर टीव्ही चॅनेल्स व त्यावरील कॉन्टेंट पाहू शकतात. याचाच अर्थ तुम्ही इंटरनेटशिवाय टीव्ही पाहू शकता, व्हिडीओ कॉन्टेंट पाहू शकता आणि तुमचा डेटादेखील संपणार नाही. डीटूएमद्वारे थेट मोबाइलवर ब्रॉडकास्टिंग (प्रक्षेपण) केलं जाईल. याद्वारे लोक माहिती आणि मनोरंजनाचा उपभोग घेऊ शकतात. यामुळे लोकांना माहिती व मनोरंजनाचा कॉन्टेंट मोफत मिळेल.

या तंत्रज्ञानामुळे मोबाइल नेटवर्कवरील ट्रॅफिक कमी होईल. इंटरनेट डेटाची बचत होईल. ग्रामीण भागात, जंगले व अशी ठिकाणे जिथे अजूनही ब्रॉडबँड नेटवर्क पोहोचू शकलेलं नाही तिथे देखील सेवा पोहोचेल. आपत्कालीन परिस्थितीत, प्रामुख्याने नैसर्गिक आपत्तीच्या काळात इंटरनेटसह वेगवेगळ्या सेवा ठप्प असतात त्या काळात ही डीटूएम सेवा उपयोगी सिद्ध होईल.

बंगळुरूस्थित सांख्य लॅब्सने एसएल ३००० ही एक खास चिप विकसित केली आहे. यामुळे मोबाइल फोन थेट सॅटेलाइट किंवा ब्रॉडकास्ट टॉवरद्वारे कॉन्टेंट मिळवू शकतो. आयआयटी कानपूरशी संबंधित Free Stream Technologies या स्टार्टपच्या सहकार्याने ही चिप विकसित करण्यात आली आहे. स्वस्तात इंटरनेट उपलब्ध करणे, नेटवर्क लोड कमी करणे, देशाच्या कानाकोपऱ्यात माहिती पोहोचवणे हे या संशोधनामागचं प्रमुख कारण आहे.

# नाटककार, साहित्यिक विजय तेंडुलकर



निमित्त

विजय तेंडुलकर हे प्रसिद्ध मराठी नाटककार, लेखक, पटकथालेखक, तथा राजकीय विश्लेषक होते. त्यांचे वडील धोंडोपंत तेंडुलकर हे स्वतः लेखक, प्रकाशक आणि हौशी नट होते. या कौटुंबिक पार्श्वभूमीतून तेंडुलकरांवर वाङ्मयीन संस्कार होत गेले. विजय तेंडुलकर यांचा आज स्मृतीदिन.

तेंडुलकरांचा जन्म कोल्हापुरात ६ जानेवारी १९२८ रोजी झाला. दि. बा. मोकाशी, वि. वि. बोकील, अनंत काणेकर, शिवरामपंत वाशीकर यांनी लिहिलेल्या साहित्याच्या वाचनातून तेंडुलकरांची घडवणूक होत गेली. तेंडुलकरांचे औपचारिक शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले. त्या काळात जोमाने चालू असलेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ते सहभागी झाले. साहजिकच या कालखंडात विविध विचारसरणींशी त्यांचा जवळून परिचय झाला. त्यांचे वास्तव्य पुण्यात आणि मुंबईत असे.

लेखनदृष्ट्या 'गृहस्थ' हे तेंडुलकरांचे पहिले नाटक. याचेच 'कावळ्यांची शाळा' या नावाने त्यांनी १९६४ साली पुनर्लेखन केले, मात्र 'श्रीमंत' हे त्यांचे रंगभूमीवरील आलेले पहिले नाटक होते. सुरुवातीच्या नाटकांपासूनच माणसाच्या जीवनाचा, त्यांच्या विकारांचा, एकारलेपणाचा वेध घेण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. विशिष्ट तत्त्वज्ञानाचा, विचारसरणीचा ठसा नाकारून तेंडुलकर मनस्वीपणे लिहीत गेले. 'शांतता कोर्ट चालू आहे' यासारख्या नाटकातून समाजाला प्रसंगी बंडखोर वाटणार्या विषयांनाही त्यांच्या लेखणीने हात घातला. 'सखाराम बाईंडर'मध्ये हाताळलेला स्फोटक विषय आणि 'घाशीराम कोतवाल' मध्ये हाताळलेला पारंपरिक तंत्राला धक्का देणारा नाट्यबंध त्यांच्या याच प्रयोगशील जाणिवांचा अविभाज्य भाग होता.

'माणूस नावाचे बेट', 'मधल्या भिंती', 'सरी गं सरी', 'एक हट्टी मुलगी', 'अशी पाखरे येती', 'गिधाडे', 'छिन्न' आदी नाटके रूढ सामाजिक संकेतांना, तसेच नाट्यसंकेतांना हादरा देणारी आणि वादग्रस्त ठरली. मानवी वृत्तीतील कुरूपता, हिंस्रता यांचे भेदक, पण वास्तववादी उग्रकठोर चित्रण असल्याने या नाट्यकृती गाजल्या. आशय आणि तंत्रदृष्ट्या असणारी विलक्षण विविधता हे त्यांचे वैशिष्ट्य ठरले आहे. त्याचप्रमाणे तेंडुलकरांनी चित्रपट माध्यमही नाटकांच्याच ताकदीने हाताळले. सामना, सिंहासन, आक्रीत, उंबरठा, अर्धसत्य, आक्रोश, आघात, इत्यादी चित्रपटांच्या पटकथा त्यांनी लिहिल्या. स्वयंसिद्धा या दूरचित्रवाणी मालिकेचे लेखनही त्यांनी केले.

मानवी मनाचे, त्यातही त्याच्या कुरूपतेचे चित्रण करून अशा व्यक्तिरेखांना समजून घेण्यात, त्यांचे जीवन मांडताना घडते-बिघडते संबंध, त्यातील ताण, त्या अनुषंगाने व्यवस्थांचे बंदिस्तपण टिपण्यात त्यांची लेखणी रमते, काव्य-कारुण्य, व्यक्ती-समाज, वास्तव-फॅन्टसी यांची कलात्मक सरमिसळ त्यांच्या नाटकांत आढळते. ६०-७०च्या काळाची पार्श्वभूमी नसती तर कदाचित तेंडुलकर नावाची दंतकथा जन्मालाच नसती आली. ते दशक होतं अनादराचं आणि प्रस्थापितांविरोधात बंड पुकारण्याचं. त्यांची नाटकं त्या काळातील परिस्थितीवर भाष्य करणारी आहेत. शांतता कोर्ट चालू आहे हे नाटक ६०च्या मध्यात येणं आणि गिधाडे, घाशीराम कोतवाल आणि सखाराम बाइंडर हे ७०च्या दशकात येणं हा काही योगायोग नाही. अशा या वेगळी भूमिका मांडणाऱ्या प्रतिभावान लेखकाचे १९ मे २००८ रोजी पुण्यात निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### ...म्हणून तरुणांमध्ये कंबर अन् नितंबदुखीत वाढ!

हल्ली तरुणांमध्ये फिटनेसची क्रेझ वाढताना दिसतेय. इतरांपेक्षा फिट अँड फाइन दिसण्यासाठी ते जिम आणि हेल्दी डाएट प्लॅन फॉलो करतात. याशिवाय तगडी बॉडी बनवण्यासाठी जिमबरोबर स्टिरॉइड्स आणि प्रोटीन पावडरचेही सेवन करतात, पण ऑर्थो पेडिकतज्ज्ञांच्या एका गटाने तरुणांच्या आरोग्याबाबत मोठी चिंता व्यक्त केली आहे. २० वर्ष वयोगटातील अनेक तरुण जिमला जाण्याबरोबर स्टिरॉइड्स आणि प्रोटीन पावडरचे अयोग्य प्रमाणात सेवन करतात, जे त्यांच्या आरोग्यासाठी घातक ठरत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. याच गोष्टींमुळे तरुणांच्या कंबर आणि नितंबाला गंभीर नुकसान होत आहे, असेही त्यांनी नमूद केले.



दिल्लीत आयोजित 'दिल्ली हिप ३६०' परिषदेदरम्यान आरोग्यतज्ज्ञांनी हा इशारा दिला आहे, ज्यात ऑर्थो पेडिकतज्ज्ञांनी म्हटले की, तरुणांमध्ये एव्हस्कुलर नेक्रोसिस आणि लवकर हिप डिजनरेशनच्या प्रकरणांमध्ये होणारी वाढ चिंताजनक आहे. ही स्थिती साधारणपणे वृद्ध प्रौढांमध्ये दिसून येते, पण तरुणांमध्येही आता ही स्थिती वाढत असल्याने काळजी घेणं गरजेचे आहे.

परिषदेचे आयोजक अध्यक्ष दिल्लीतील मॅक्स हॉस्पिटलचे ऑर्थोपेडिक्स आणि जॉइंट रिप्लेसमेंट युनिटचे प्रमुख डॉ. एल. तोमर म्हणाले की, गेल्या काही वर्षांत तरुणांमध्ये नितंबाशी संबंधित तक्रारींमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे. माझ्या ओपीडीमध्ये दर आठवड्याला ३० वर्षांखालील दोन ते तीन रुग्ण नितंबाशी संबंधित तक्रारी घेऊन येतात. ज्यांपैकी बरेच जण २० वर्षांखालील असतात, जे जिम सुरू केल्यापासून सतत नितंब दुखत असल्याची तक्रार करतात. यावेळी तपासणीत अनेकदा एव्हस्कुलर नेक्रोसिसमुळे हा त्रास होत असल्याचे दिसून येते. एव्हस्कुलर नेक्रोसिस हा अशाप्रकारचा त्रास आहे, ज्यात नितंबाच्या हाडांमध्ये योग्यप्रकारे रक्तपुरवठा होण्यास अडचणी येतात, ज्यामुळे हाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यातील ७० टक्क्यांपेक्षा जास्त रुग्णांना ॲनाबॉलिक स्टिरॉइडचा वापर किंवा प्रोटीन पावडरच्या अतिसेवनामुळे हा त्रास वाढत असल्याचेही दिसून आले.

अलीकडील एका अभ्यासातून असे दिसून आले की, तरुणांमध्ये नितंबाशी संबंधित समस्यांमध्ये वाढ होत असल्यामुळे एव्हीएन होण्याचा धोका वाढतोय, ज्यास अल्कोहोल आणि स्टिरॉइडचा अतिवापर कारणीभूत असल्याचे सांगितले जाते.

# श्रीवर्धनमध्ये विकासकामांचे भूमिपूजन

## माजी आमदार पंडित पाटील यांच्या हस्ते शुभारंभ



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील विविध विकासकामांचे भूमिपूजन भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार पंडित पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या भूमिपूजनाच्या निमित्ताने तालुक्यात नव्या राजकीय हालचालींना चालना मिळाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

माजी आमदार पंडित पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून श्रीवर्धनमध्ये एक ओळख निर्माण केली होती. सध्या भारतीय जनता पक्षात कार्यरत असलेल्या पाटील यांनी विकासाच्या माध्यमातून जनतेशी पुन्हा एकदा संपर्क वाढवण्यास सुरुवात केली आहे.

बाजारपेठ मुख्य रस्ता ते कुंभारवाडा रस्त्यापर्यंत काँक्रिटीकरण तसेच काळेश्री देवी मंदिर परिसरात स्ट्रीट लाईट्स बसवण्याच्या कामांचे भूमिपूजन त्यांनी नुकतेच केले.

ही कामे खासदार धैर्यशील माने पाटील यांच्या आशीर्वादाने आणि पंडित पाटील यांच्या पाठपुराव्याने मंजूर झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या भूमिपूजन प्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष आशुतोष पाटील, शहराध्यक्ष लक्ष्मण पावशे, महिला शहराध्यक्षा सुप्रिया चोगले, रविना गुरव, मनिषा श्रीवर्धनकर, तसेच वसंत यादव यांच्यासह भाजपाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमातून भाजपाची संघटनात्मक ताकद अधोरेखित झाली असून, महिला प्रतिनिधींची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. विकासकामांमुळे थेट नागरिकांच्या गरजा पूर्ण होत असल्याने जनतेत समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

पंडित पाटील यांची ही सक्रियता आगामी स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची ठरू शकते. विकासकामांच्या माध्यमातून लोकांशी संवाद वाढवण्याचे धोरण त्यांनी अवलंबलेमुळे त्यांच्या राजकीय पुनर्सक्रियतेचा मार्ग मोकळा होत असल्याचे चित्र आहे.

## माणगावजवळ अपघातात एकाचा मृत्यू

**माणगाव :** कुंभार्ते गावाच्या बस स्टॉप जवळ रोडच्यामध्ये कुत्रा आल्याने जोरात ब्रेक केला असता मोटार सायकल स्लिप होवून अपघात झाला. या अपघातात मोटरसायकल चालक यांचा मृत्यू झाला असून गाडीचे नुकसान झाले आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, दि. १६ मे रोजी रात्री ९.१५ वा. च्या सुमारास मयत संतोष लक्ष्मण लमानी, वय ४० वर्ष, हा त्याच्या ताब्यातील मोटार सायकल चालवित असताना रोडच्यामध्ये कुत्रा आल्याने ब्रेक केला असता मोटार सायकल स्लिप होवून अपघात झाला. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. स. ई. काळे करीत आहेत.


### ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी
### मु.तांबाटी, पो. डोणवत, ता.खालापूर, जि.रायगड.

| अ. क्र. | कामाचे नांव | निधी | अंदाजपत्रकीय रक्कम रूपये | ईसारा रक्कम | निविदा फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कार्यालयासमोरील बोरवेल दुरुस्त करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ | ९९८३०/- | ५०००/- | २००/- | ६ महोने |
| २ | ग्रामपंचायत हद्दीतील शासकीय इमारती यांना पाडुस पाणी संकलन करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ | ४३४१००/- | ९९९४/- | २००/- | ६ महीने |
| ३ | घनकचरा शेडला पाण्याची व्यवस्था व टाकी करणे. | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ | १०००००/- | ५०००/- | २००/- | ६ महोने |
| ४ | ग्रामपंचायत कार्यालयासमोरील झाडांना ठिबक सिंचन करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ | ४९८९०/- | ५०००/- | २००/- | ६ महीने |
| ५ | वनवठे येथे स्मशानभुमी येथे चौथर बांधुन टाकी बसविणे | ग्रामनिधी सन २०२४/२५ | १८७९८४/- | १८७९/- | २००/- | ६ महीने |

**अटी व शर्ती :-**

१. सदर कामाच्या पुर्ण भरलेल्या निविदा दि १९/०५/२०२५ ते दि. २५/०५/२०२५ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळुन सकाळी १० त ५ पर्यंत कोटेशन ग्रामपंचायत कार्यालयात जमा करावयात. आलेल्या निविदा दि. २६/०५/२०२५ च्या मासिक सभेत फोडण्यात येईल.
२. प्राप्त निविदा ग्रामपंचायत कार्यालयात हजर निविदा धारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष दिनांक २६/०५/२०२५ पर्यंत दुपारी ठीक १२.०० वाता उघडण्यात येतील.
३. आलेल्या निविदापैकी कोणतेही कोणतेही एक निविदा स्वीकारण्याची अथवा आलेल्या सर्व कोटेशन नाकारण्याचे सर्वस्व अधिकार ग्रामपंचायत तांबाटीने राखुन ठेवलेला आहे.
४. निविदा बंद लखोट्यात असावे
७. पोस्टाने निविदा स्विकारल्या जाणार नाही.
८. अटी व शती घालुन सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
९. पुरेसी स्पर्धा न झाल्यास प्रक्रीया रद्द करुन फेर प्रक्रीया करण्यात येईल,

**जावक क्र. ४०४**
**दिनांक : १७/०५/२०२५**

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी**


## साने गुरूजी राष्ट्रीय स्मारकात उन्हाळी अभिव्यक्ती शिबिर



**पोलादपूर : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही मे महिन्याच्या सुट्टीत साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाच्या ३७ एकरच्या निसर्गसंपन्न परिसरातील कायमस्वरूपी कॅम्प साईटवर १० ते १४ वर्ष वयोगटाच्या मुलामुलींसाठी हे पाच दिवसीय निवासी शिबीर २४ मे ते २८ मे २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.

'करी मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभूशी तयाचे' असे म्हणणाऱ्या परमपूज्य साने गुरुजींच्या 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' या विचारांचा वसा घेऊन साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक गेली पंचवीस वर्षे कार्यरत आहे. स्मारकातर्फे कुमारवयीन मुलामुलींसाठी दरवर्षी मे महिना व दिवाळीच्या सुट्टीत धम्माल करता करता नवीन अनुभव, नवीन ज्ञान मिळवण्यासाठी व अभिव्यक्त होण्याची संधी देण्यासाठी अभिव्यक्ती शिबिराचे आयोजन केले जाते.

मातीच्या स्पर्शाने सुरवात होणाऱ्या या शिबिरात मुलं मोकळ्या आभाळाखाली मातीत हात घालून मातीचा स्पर्श मनात साठवतात, मातीशी असलेलं आपलं नातं समजून घेतात, चाकावरचं कुंभारकाम शिकतात आणि मातीपासून स्वतः वस्तू बनवतात. सकाळी लवकर उठून संगीताच्या तालावर मुलं व्यायाम करुन पक्षी निरिक्षणाला निघतात.

कधी सकाळी नदीवर फिरायला मुलं जातात तर कधी स्मारकातल्याच नेचर ट्रेलला आणि कधी बैलगाडीतील सफरीलाही. मुलांमध्ये साहसीवृत्ती वाढावी यासाठी झूमरिंग सारखे साहसी खेळही घेतले जातात. मैदानी खेळ आणि समतेची शिकवण देणारी नवनवीन गाणीही मुलं शिबिरात शिकतात. स्मारकात असलेल्या मोठ्या टेलिस्कोपच्या मदतीने मुलं आकाशातील ग्रहगोल बघतात आणि विज्ञान समजू लागतात. त्याआधी अंधारातला थरारही मुलं अनुभवतात आणि अंधार आणि त्याच्याशी संबंधीत अंधश्रध्दांबद्दलही मोकळेपणाने बोलतात. नाट्यलेखन व अभिनयाच्या अभिव्यक्तीला कोणत्याच सीमा नसतात हे मुलं नाट्याविष्कारातून शिकतात आणि मग पाच दिवसात छोट्या छोट्या नाटुकल्या तयार होतात.

शिबिराच्या प्रवेश प्रक्रियेसाठी स्मारक कार्यालय - ७७७६९३७८४४, चिंतामणी - ९६५७६५१०३५ आणि राहुल - ९८६०६१९०३१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाच्या वतीने करण्यात आले आहे.


### महाराष्ट्र शासन

**आधारसामग्री, संकलन व नियोजन व जलविज्ञान मंडळ, नाशिक अंतर्गत, कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, कळवा - (ठाणे)**

**पत्ता :- सहकार विद्यालय समोर, जुना मुंबई-पुणे महामार्ग, कळवा (ठाणे) ४००६०५**
**ई-मेल :- echpthn@rediffmail.com दूरध्वनी क्रमांक ०२२-२५४२६०५३**

**ई-निविदा सुचना क्र ०१ सन २०२५-२०२६**
**Main Portal: http://mahatenders.gov.in**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा मार्गावत आहे. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलका वर उपलब्ध आहे निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग. कळवा (ठाणे) यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल हात असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविणेत येईल.

कामाचे नांव-:- Real Time Data acquisition System(RTDAS-3)For West Ward Flowing Rivers Basins in Konkan Region to Control Flood

जिल्हा :- ठाणे

निविदेची अंदाजित किंमत :- रु. **२,८०,३२,०००/-**

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक-१९/०५/२०२५ ते दिनांक २६/०५/२०२५

ई-निविदा उघडणे : दिनांक - :- २७/०५/२०२५ वेळ १७.०० वा.

स्थळः कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) यांचे कार्यालय

**संकेतस्थळावर प्रसिध्द होणा-या निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीने संबंधित कार्यालयात उपस्थित रहावे अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही.**

**जा. क्र. विप्रविक /लेशा-२/६८०/२०२५**
**कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) यांचे कार्यालय,**
**दिनांक : ०८/०५/२०२५**

**सही/-**
**श्रीमती प्रा से पाटील**
**कार्यकारी अभियंता,**
**जलविज्ञान प्रकल्प विभाग,**
**कळवा (ठाणे)**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर सूचना देण्यात येते की, श्री. सुनिज वैजिनाथ पाटील व श्री. यशवंत वासुदेव पाटील यांच्या मालकीचे प्रत्यक्ष ताबेकब्जातील मौजे अडीवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील नमूद शेतजमिन मिळकत आमचे अशिल हे कायमस्वरूपी विकत घेणार आहेत.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे अडीवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १०८ | ० | ०-४५-८० <br> पो.ख. ०-०२-०० <br> **एकूण क्षेत्रफळ ०-४७-८०** | ८.०६ |

तरी सदरहू मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदिल, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधीतांनी आपाआपल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे सकृतदर्शनी लेखीपुराव्यासहीत आपल्या हरकती नोंदवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत हे सर्व लोकांस कळावे.

**दिनांक : १८/०५/२०२५**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**ॲड. आनंद वाय.धोंगडे**
**ॲडव्होकेट**

**पत्ता** :- १०३, ए विंग, निल रिद्धी एमरलॅण्ड, प्लॉट नं. ५२७, तहसील ऑफिस जवळ, पनवेल मोबाईल नं. ७५०६४९८५०३


### कोकण विभागात माणगाव शिक्षण विभाग द्वितीय



**माणगाव : बातमीदार**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी शासनाच्या सर्व विभागांसाठी एक महत्वकांक्षी १०० दिवसांचा सात कलमी कार्यालयीन सुधारणा विशेष कृती आराखडा उपक्रम हाती घेतला होता. या १०० दिवसांच्य कृती आराखड्यात कोकण विभागातून शिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती माणगावला द्वितीय क्रमांक मिळालेला आहे.

यायशाबद्दल गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांचे व संपूर्ण शिक्षण विभागाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रातील सर्वच तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांनी केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले , जिल्हा शिक्षणाधिकारी पुनिता गुरव व अन्य मान्यवरांनी हा बहुमान पटकावल्याबद्दल सुरेखा तांबट यांचे व त्यांच्या संपूर्ण शिक्षण विभागाचे विशेष कौतुक केले आहे.


## 'वडगाव शाळा समर कॅम्पमुळे शिक्षणाचा दर्जा सुधारणार'

**चौक : प्रतिनिधी**

आदर्श माझी शाळा पुरस्कार विजेती शाळा वडगांव येथे विद्यार्थी समर कॅम्प, पाढे पाठ करीत आहेत. त्यामुळे येथील विद्यार्थी यांचा शिक्षण स्तर उंच होईल. रायगड जिल्हा परिषद व प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन च्यावतीने कमालचा कॅम्प उन्हाळी शिबिराचे जिल्हाभरातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले(भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे.

शिबिरास जिल्हाभरातून उदंड प्रतिसाद लाभत आहे.रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,वडगाव येथे दररोज दोन तास शिबीर चालत असून यात भाषा,गणित या विषयांसाठी उपक्रम,खेळ,गप्पा,गाणी,पाढे असे विविध कार्यक्रम घेतले जात आहेत. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड हे स्वतः उपस्थित राहत असून स्वयं सेविका निकिता गडगे, भाग्यश्री तांबोळी, आकांक्षा जाधव व संचिता गडगे या सुद्धा सकाळ, दुपार व सायंकाळी वेळ देऊन सर्व उपक्रम यशस्वीपणे पार पाडत उन्हाळी शिबिराला सहकार्य करत आहेत.

विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनाची गोडी लागत असून भाषिक मूलभूत कौशल्य व गणितीय संबोध दृढीकरण चांगल्या प्रकारे होत आहे.पालकांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. रात्रीसुद्धा मुले शिबिराला उपस्थित राहत आहेत. या उन्हाळी शिबिराला चांगला प्रतिसाद मिळत आहे



## तीन वर्षांपूर्वी हरवलेल्या व्यक्तीचा अद्याप शोध नाही

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाण्यात १४ फेब्रुवारी २०२२ रोजी दाखल करण्यात आलेल्या मिसिंग केस संदर्भात या व्यक्तीचा शोध घेतला असता, तो सापडून आला नाही. सदर व्यक्ती कुणाला आढळल्यास खालापूर पोलीस यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

देवशेतवाडी येथून सुदाम लक्ष्मण धारपावर हे ९ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घरातून निघताना लाल रंगाचा टी शर्ट व काळ्या रंगाची फुल पँट परिधान केली होती. निमगोरा रंग असून उंची १७२ सेंटिमीटर आहे. गोल चेहरा, सडपातळ अंग, काळे डोळे, काळे पांढरे केस,कपाळावर गंध आणि कपाळावर चामखीळ आहे. याबाबत कुणाला माहिती असल्यास अथवा वरील व्यक्ती आढळल्यास ०२१९२२७५०३३ व ७७२२००३८४८ या क्रमांकावर संपर्क साधावा


### पाहिजेत - संगणक प्रशिक्षक व हार्डवेअर इंजिनिअर

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक विभागातील शाखेमध्ये के आय आय टी, सातारा मार्फत खालील प्रमाणे पूर्णपणे हंगामी, कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने, तात्पुरत्या स्वस्पाच्या व तात्पुरत्या कालावधीसाठी (सत्र नुसार) तासिका त्तवावरती (CHB) निवड करावयाची आहे.

**१. संगणक प्रशिक्षक** (Computer Lab Instructors) शै. पात्रता BE (CS/IT) / MCA/MCM/M.Sc (CS/IT)/D.C.E/PGDCA/B.C.S/B.C.A. /किंवा पदवीधर व १ वर्षे / ६ महिने कालावधीचा शासनमान्य कॉम्प्युटर कोर्स. अनुभव असणा-यास प्राद्यान्य.

**२. हार्डवेअर इंजिनिअर** शै. पात्रताः MCSA किंवा पदवीधर व शासनमान्य १ वर्ष /२ वर्ष कालावधीचा Hardware Engineering कोर्स. अनुभव असणा-यास प्राद्यान्य. विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज व सविस्तर माहिती www.kiitsatara.blogspot.in या ब्लॉग वरती उपलब्ध आहे ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख २४/०५/२०२५ आहे, मुलाखत दिनांक :- शुक्रवार ३०/०५/२०२५ संपर्क- ०२१६२-२३६१५१

**ठिकाण :- न्यू इंग्लिश स्कूल, कामोठे (लोकनेते दि.बा.पाटील कामोठे), ऐश्वर्या हॉटेल जवळ.**



### सावधान नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमिन मिळकतीबाबत आमचे अशिल श्री. कमलाकर हिरू घरत, सुशिला कान्हा घरत, शांतिलाल कान्हा घरत, कांतिलाल कान्हा घरत, सारीका मोतीराम म्हात्रे, ममता शंकर भोईर, सर्व रा. ओवळे, ता. पनवेल, जि. रायगड पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश, क.स्तर यांचे न्यायालयांत रे.मु.नं. ५४/२०२५ श्री. मनोहर कान्हा दमडे, संतोष कान्हा दमडे, चतुरा हेमंत तांडेल, गंगुबाई कान्हा दमडे व रंजना कान्हा दमडे, सर्व रा. भंगारपाडा, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या विरोधात मालकी हक्क ठराव करून मिळणेकरीता, सरसनिरस वाटपाकरीता व निरंतरचे ताकीद हुकुमाकरीता दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या जमिन मिळकतीमध्ये श्री. कमलाकर हिरू गरत वगैरे यांनी १/३ हिश्श्याची मागणी केलेली आहे. सदरचा रे.मु.नं. ५४/२०२५ हा न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ आहे. त्यामळे सदर मिळकती संदर्भात मनोहर कान्हा दमडे वगैरे यांच्याबरोबर कोणताही खरेदी, विकी अगर विकसनचा व्यवहार करू नये सदर व्यवहार आमच्या अशिलांच्या हरकतीशिवाय कल्यास सदर प्रकरणी होणाऱ्या नुकसानीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

| मौजे | स.नं./हि.नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| मौजे मोसारे, ता पनवेल , जि रायगड | १२/१+३ <br> १२/२ | ०-२९-३ <br> ०-७३-३ | १.५३ <br> ७.९४ |

येणेप्रमाणे सावधान नोटीस

**पनवेल**
**दिनांक- १७/०५/२०२५**

**सही/-**
**श्री. एस.के. राणे.**
**ॲडव्होकेट**
**पत्ता-शॉप नं.६२३ नगरपालिका कॉम्पलेक्स, भाजी मार्केटजवळ, पनवेल-४१२२२६, जि. रायगड**
**मोबा न ९८१९८६९२१२**



### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ११/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्र .. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा वितरण वाहिनीसाठी फायर हायड्रंट्स पुरविणे तसेच व्हॉल्व्हकरीता चेंबरची दुरुस्ती करणे व आरसीसी चेंबर्स बांधणे. | ₹ २९,१५,६८२.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २०/०५/२०२५ ते दिनांक ०३/०६/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २३/०५/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २७/०५/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# अभीष्टचिंतन





























# भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ पेणमध्ये तिरंगा रॅली

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय सैनिकांच्या शौर्याला नमन करण्याच्या हेतूने पेणमध्ये रविवारी (दि. १८) तिरंगा रॅली काढण्यात आली होते. या रॅलीत लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि देशप्रेमी नागरिक सहभागी झाले होते.

पेणमध्ये भारतीय जनता पक्ष तसेच नागरिकांच्या वतीने तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, माजी गटनेते अनिरुद्ध पाटील, माजी जि.प. अध्यक्ष नीलिमा पाटील, माजी जि.प. उपाध्यक्ष आस्वाद पाटील, चित्रा पाटील, युवा नेते ललित पाटील, पाली नगराध्यक्ष गीता पालरेचा, भाजप जिल्हा चिटणीस मिलिंद पाटील, माजी नगराध्यक्ष जनार्दन जाधव, माजी उपनगराध्यक्ष दिलीप लाड, वैशाली कडू, अ‍ॅड. मंगेश नेने, माजी नगरसेविका शहनाज मुजावर, राजेश मापारा, बाजार समिती सभापती महादू मानकर, तालुका अध्यक्ष विजय पाटील, प्रकाश रामाणे, अजय क्षीरसागर, माजी जि.प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, विनोद शहा, डी.बी. पाटील, देवता साकोस्कर, स्वप्नील म्हात्रे, मुरलीधर भोईर, साकिब मुजावर आदींसह माजी सैनिकांनी सहभाग घेतला.

या वेळी बोलताना खासदार धैर्यशील पाटील यांनी सांगितले की, पहलगाम येथे झालेल्या आतंकवादी हल्यानंतर आपल्या तिन्ही दलातील सैनिकांनी पाकिस्तानवर हल्ला करून जशास तसे उत्तर देऊन यापुढे दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही हे दाखवून दिले असून यामध्ये आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेली कठोर भूमिका व त्याला तिन्ही सैन्य दलांनी दिलेली साथ यामुळे आता कोणत्याही आक्रमणाला परतवून लावण्याची क्षमता भारतात असल्याचा एक संदेश जगाला देण्याचे काम भारत सरकारने केले आहे.

माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील म्हणाल्या की, भारतीय सैन्याच्या शौर्याला वंदन करण्यासाठी कोणताही धर्म, कोणताही पक्ष न पाहता एक भारतीय, एक देशभक्त ही भूमिका घेऊन या रॅलीत आम्ही सारे सहभागी झालो असून पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

माजी जिल्हा परिषद अध्यक्ष नीलिमा पाटील यांनी सांगितले की, पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात दहशतवाद्यांनी आपल्या भगिनींचे सिंदूर पुसण्याचे काम केले. त्यांना चोख प्रत्युत्तर देण्याचे काम सैन्यातील अधिकारी व्योमिका सिंह, सौफिया कुरेशी यांच्या नेतृत्वाखाली तिन्ही दलातील जवानांनी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून केले असून भ्याड हल्ला करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. एक भारतीय नागरिक म्हणून आम्ही एकसंध असून या रॅलीच्या माध्यमातून सैनिकाच्या शौर्याला सलाम करीत असल्याचेही त्यांनी सांगितले .

तिरंगा रॅली गांधी मंदिर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील स्वातंत्र्यसेनानी स्मारक येथून प्रारंभ केल्यानंतर पेण नाका, राजू पोटे मार्ग, खाटीक आळी, महावीरमार्गे, छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी नेण्यात आली. तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. या वेळी ठिकठिकाणी रॅलीवर नागरिकांनी पुष्पवृष्टी केली. गांधी मंदिर येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.



## साळाव पूल परिसरात ड्रोनने शुटींग करणाऱ्यावर गुन्हा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हाधिकारी यांचा मनाई हुकूम असतानाही या आदेशाचे उल्लंघन करून प्री-वेडींग शुटींगसाठी साळाव पूल व परिसरात ड्रोनने चित्रीकरण करण्याचा प्रकार घडला. या प्रकरणी एकजणाच्या विरोधात रेवदंडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

रेवदंडा परिसर निसर्गाने नटलेला आहे. त्यामुळे प्री-वेडींग शुटींगसाठी फोटोग्राफर्सना खास आकर्षण या परिसराचे आहे, मात्र सध्या भारत-पाक युद्धजन्य परिस्थिती व त्या अनुषंगाने रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या मनाई हुकूमानुसार संपूर्ण जिल्ह्यात ड्रोन चित्रीकरणास बंदी आहे. साळाव पुलावर १७ मे रोजी सकाळी ७.३०च्या सुमारास कुलदीप गजेंद्र उपाध्याय (वय २५, रा. बदलापूर, जि. ठाणे) याने लग्नाचे प्री-वेडींग शुट करण्याच्या उद्देशाने साळाव पुलापासून समुद्र किनारा परिसर चित्रीकरण करण्याच्या हेतूने विनापरवाना ड्रोन कॅमेऱ्याचा वापर केला.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्याचे शिपाई जितेंद्र रामचंद्र मगर यांनी फिर्याद दिली. त्यानुसार कुलदीप उपाध्याय याच्याविरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## बांगलादेशी तीन महिलांसह आश्रय देणाऱ्या महिलेलाही अटक

**खोपोली पोलिसांची कारवाई; २० मेपर्यंत पोलीस कोठडी**

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील शिळफाटा, पटेलनगर, मिळगाव आदी भागातून तीन बांगलादेशीय महिला आणि त्यांना आशय देणाऱ्या एका महिलेला खोपोली पोलिसांनी अटक केली आहे. सर्वांना न्यायालयात हजर केले असता २० मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

या तिन्ही बांगलादेशी महिला दहा दिवसांपूर्वी खारघर येथून खोपोलीत वास्तव्यासाठी आल्या होत्या. त्यांना आशय देणारी महिलाही बांगलादेशी असल्याचा पोलिसांना संशय असून



अटक केलेल्या सर्व महिलांना न्यायालयाने २० मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. देशात बेकायदेशीररित्या प्रवेश करून बेकायदा अधिवास करणाऱ्या लोकांमध्ये बांगलादेशी नागरिकांचे प्रमाण जास्त आहे. अशा बेकायदेशीररित्या प्रवेश केलेल्या बांगलादेशी नागरिकांची शोधमोहीम राबविण्याचे आदेश रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांनी दिले होते. त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली पोलीस निरीक्षक शितल राऊत यांना प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक पूजा चव्हाण, उपनिरीक्षक के.एस. निकाळजे व पथकाने शिळफाटा भागातील पटेलनगर, मिळगाव आदिवासीवाडीत राहणाऱ्या मरुफा अझर कुरेशी (वय ५०) या महिलेच्या घरी बांगलादेशी महिला वास्तव्यास असल्याची माहिती मिळाल्यानंतर झाडाझडती घेतल्यानंतर तीन महिला आढळून आल्या.

या सलीमा सलीम शेख (वय ४०), नजमा सलीमांग फकीर (वय ३०), पॉपी सलीम शेख (वय २४) या बांगलादेशीय महिलांकडे पासपोर्ट आणि भारत देशामध्ये प्रवेश करण्याकरिता भारताचा व्हिसा अशा कायदेशीर कागदपत्रांची मागणी केली असता, त्यांच्याकडे अशा प्रकारची कोणतीही वैद कागदपत्रे नसल्याचे आणि त्यांनी भारतात अनधिकृतपणे व कोणत्याही वैध कागदपत्राशिवाय प्रवेश केल्याचे मान्य केले आहे. दहा दिवसांपूर्वी त्यांनी खारघर येथून आपण खोपोलीत आल्याचे कबूल केले.

दरम्यान आशय देणारी महिला मुरुफा अझर कुरेशी हीदेखील बांगलादेशी नागरिक असल्याचा खोपोली पोलिसांना संशय आहे. या सर्व महिलांविरुद्ध खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांना न्यायालयाने २० मेपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. या प्रकरणी खोपोली पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## शेतकरी मशागतीमध्ये व्यस्त

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात पाऊस लवकर येण्याचा पक्षी व निसर्ग यांच्यातील बदलाने शेतकरी अंदाज वर्तवित असून हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजाने बळीराजा शेतीच्या मशागतीबरोबरच आपल्या शेतात कोणकोणती पिके भातशेतीला पूरक करता येतील याचेही नियोजन करत आहेत

भातशेतीची बांध बंदिस्ती, कुंपण घालणे, धुळवड वाफे तयार करणे, घराच्या शेजारील परसावात भाजीपाल्याची लागवड करण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने कुंपण घालून आळी तयार करून ठेवणे. पावसाळ्यात शेतीत पाणी अधिक झाल्यास त्याचा निचरा कसा होईल. ज्या शेतीत पाणी राहात नाही त्या शेतात पाणी कसे थांबविता येईल या दृष्टीने नियोजन व कामे शेतकरी करत आहे.

तालुक्यातील शेतीही डोंगराळ भागातील अधिक असल्याने शेतीचे जंगली माकडे, डुक्कर इत्यादी प्राण्यांपासून नुकसान होत असते त्या दृष्टीने उपाय कसे करता येतील हे नियोजन ही महत्त्वाचे आहे.

तालुक्यात काही भागात आजही भाजीपाला लागवड केलेली आहे. त्यातून



चांगले उत्पन्नही मिळत आहे. बोरघरहवेली येथील शेतकरी दामोदर चव्हाण यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की या उन्हाळ्याच्या दिवसात आपल्या भागात ज्याठिकाणी पाणी आहे. त्या ठिकाणी माठाची भाजी व इतर पालेभाज्या व मिरचीचे पीक चांगले उत्पन्न देत असते. त्या दृष्टीने थोड्या खर्चात व कमी

मेहनतीने हे पीक मी स्वतः घेतले चांगले उत्पन्न मिळाले आहे. त्याचबरोबर आता मान्सूनचा पाऊस थोड्याच काळावधीत सुरू होईल. तेव्हा भातशेतीचे बांध व मशागत सध्या चालू असून या भात शेतीबरोबर शेताच्या बांधावर भेंडीची लागवड, टॉमेटो, मिरची इत्यादी नियोजना प्रमाणे लागवड करून चांगल्या प्रकारे पीक घेणार आहे. मागील वर्षी हा प्रयोग यशस्वी झाला आहे. अशा प्रकारे चांगले उत्पन्न मिळेल असा अंदाज सांगितला आहे. त्याचबरोबर आपल्या शेतीत चांगले उत्पन्न मिळते कष्ट व मेहनत महत्वाची आहे.

## मोहोपाडा सेबीवळणावर पुलानजीक भगदाड; अपघाताची भीती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा ते दांड फाटा या मार्गावरील सेबी वळणावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाजवळ खालच्या बाजूला एका चेंबरला भला मोठा भगदाड पडले असून मोठ्या अपघातांची शक्यता निर्माण झाली आहे

दांडफाट्याकडे तसेच एनआयएसएम सेबीकडे ये जा करणा-या वाहनांची रेलचेल या रस्त्यावरुन असते.अशावेळीवाहन चालकांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. या भल्या मोठ्या भगदाडमुळे अपघात होऊन वाहनचालकांना जखमी व जीवितहानी होण्याचा धोका संभवतो. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि रसायनी पाताळगंगा मराविमने याची दखल घेऊन सेबी रोड जवळ असलेल्या पुलालगत असलेल्या भल्या मोठ्या चेंबरवरील भगदाडाचा बंदोबस्त कायमस्वरूपी करावा, अशी मागणी प्रवासी व नागरिकांतून होत आहे.



**एमसीए आंतरजिल्हा क्रिकेट सामन्यांचे यशस्वी आयोजन**

## रायगड संघाचा सुपर लीगमध्ये प्रवेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या सोळा वर्षाखालील ड गटातील पंधरा सामने खेळवण्यात आले. त्यात रायगड, कोल्हापूर, सातारा, युनायटेड क्रिकेट क्लब पुणे, वायएमसीए क्लब पुणे अशा सहा संघाचा समावेश होता. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघाने साखळी फेरीतील सर्व सामन्यात दोन थेट विजय, पहिल्या डावाच्या आघाडीवर एक विजय, तर दोन सामने अनिर्णित राहिले होते १८ गुण प्राप्त करून सुपर लीग सामन्यांसाठी दिमाखात प्रवेश निश्चित केला आहे.



एमसीएच्या आंतरजिल्हा निमंत्रित सोळा वर्षाखालील मुलांच्या दोन दिवसीय पंधरा सामन्यांचे आयोजन आरडीसीएकडे देण्यात आले होते. त्याचे यशस्वी आयोजन रायगड जिल्ह्यातील रिलायन्स क्रिकेट मैदान नागोठणे, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण उलवे, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केटसच्या मैदान, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण पेण, पनवेल महापालिकेचे दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकॅडमी मैदान व माजगाव क्रिकेट क्लब मैदान रोडपाली येथे करण्यात आले होते.

रायगड जिल्ह्यात पहिल्यांदाच एमसीएच्या आंतरजिल्हा निमंत्रित क्रिकेट स्पर्धेचे आयोजन दिल्याबद्दल आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी एमसीएचे आभार मानले आहेत. भविष्यात रायगड जिल्ह्यात एमसीएच्या सामन्यांचे आयोजन करण्यात येणार असून रायगड जिल्ह्यात लेदर बॉल क्रिकेटच्या विकासासाठी आरडीसीए प्रयत्नशील असणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सामन्यांचे आयोजन यशस्वीरीत्या केल्याबद्दल आरडीसीए पदाधिकारी व सदस्य, पंच व गुणलेखक, सामनाधिकारी समन्वयक तसेच परिश्रम घेणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आभार आरडीसीएचे अध्यक्ष पाटील यांनी मानले.

## पेण येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

**पेण : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे आणि माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या पुढाकाराने वरदाई ट्रस्ट रोहा व द युनिक अकॅडमी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पेण चिंचपाडा येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पेण तालुका व शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आगरी समाज हॉलमध्ये घेण्यात आलेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन पक्षाचे पेण विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभास तालुकाध्यक्ष दयानंद भगत, पेण शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, पेण विधानसभा महिला अध्यक्ष वसुधा पाटील, वकील सेल जिल्हाध्यक्ष मंगेश नेने, गंगाधर पाटील, मीनाक्षी पाटील, शहर युवती अध्यक्ष मुस्कान झटाम, अमित कुंभार, हमजा नाईक आदी उपस्थित होते. या वेळी युनिक अकॅडमीचे केतन कुमार पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेस मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली.




## भाऊसाहेब गोलार यांना बढती

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील लोधीवली ग्रुप ग्रामपंचायतीचे अधिकारी भाऊसाहेब गोलार यांना बढती मिळाली असून ते माणगाव तालुक्यात विस्तार अधिकारी बनले आहेत. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.



भाऊसाहेब गोलार यांचा खालापूर तालुक्यातील एक शिस्तप्रिय आणि उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी म्हणून लौकिक आहे. शासनाच्या प्रत्येक अभियानात त्यांचा सहभाग असतो. स्वच्छ पाणीपुरवठा, स्वच्छता अभियान, वृक्ष लागवड, वृक्ष जोपासणे, प्लास्टिकमुक्ती यावर त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. माझी वसुंधरा अभियान ५.०वरही काम केले आहे.

आपल प्रशासकीय कार्यालय स्वच्छ व जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी तत्पर सेवा केंद्र गोलार यांनी उभे केले आहे. त्यांच्या कार्यकाळात नवीन प्रशासकीय इमारत उभी राहिली, तर स्वच्छता अभियानासाठी घंटागाडीची सुविधा उपलब्ध झाली.

## पोलादपूर येथे श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील तांबड भुवन जगताप बंगला परिसरात जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळा हा गणेश नाथ महाराज संस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याची सांगता अरविंदनाथ महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत पारायण झाली.

संत तुकाराम महाराज प्रतिमा पूजन जयेश व प्रीती जगताप या दाम्पत्याच्या हस्ते करण्यात आले. गाथा पारायण प्रमुख पांडुरंग महाराज उतेकर यांच्या उपस्थितीत सोहळ्यास प्रारंभ झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत प्रमुख दत्तोपंत साळुंखे यांच्या उपस्थितीत विष्णूसहस्त्रनाम पठण करण्यात आले. व्यासपीठ पूजन राहुल व पूजा चिकणे यांच्या हस्ते करण्यात आले.

वसंतमहाराज साने तसेच श्री संत गणेशनाथ महाराज परिवार पुरुष व महिला साधक यांच्या उपस्थितीत हरिपाठ झाला. दुसऱ्या दिवशी सायंकाळी नर्मदा परिक्रमेवर नंदाताई मेस्त्री यांचे



प्रासंगिक कीर्तन झाले. अरविंदनाथ महाराज यांच्या उपस्थितीत नर्मदा परिक्रमावासीयांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. उत्सव प्रमुख ज्ञानोबा मालुसरे तसेच ज्येष्ठ गुरूबंधू पोलादपूर शहरातील सर्वसामाजिक सेवाभावी संस्था आणि श्री गणेशनाथ महाराज परिवार या प्रसंगी श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील राहिले.

अखेरच्या दिवशी पांडुरंग महाराज उतेकर यांच्या प्रसादाच्या कीर्तनानंतर गाथा पारायण सोहळ्याची सांगता झाली.

